

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)
(UGC Approved
Journal No. 63716)


# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 4 NO. 1 JAN 2018 BOOK A
A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

SPECIAL ISSUE

On the Occasion of One Day National Conference On

## ROLE OF WOMEN IN INDIAN ECONOMIC EMPOWERMENT



*Editor*
**Dr. Minakshi B. Jadhav**

*Principal*
**Dr. A. D. Mohekar**

ORGANIZED BY
DEPARTMENT OF ECONOMICS
DNYAN PRASARAK MANDAL'S
SHIKSHAN MAHARSHI DNYANDEO MOHEKAR MAHAVIDYALAYA,
KALAMB. DIST. OSMANABAD

Scanned with OKEN Scanner

## Guidelines for Authors

No manuscript will be considered which has already been published or is being considered by another journal / book.

Papers should be typed in MS Word 2003/2007.

Paper size: A4, Font & size: Times New Roman 12, line spacing: 1, Margin of 1 inch on all sides.

The tables and figures in the text should be centralized.

References should be cited in MLA parenthetical style. (Name of the author and page numbers in the parenthesis in the text and list of the works cited arranged alphabetically at the end of the paper)

The paper must be accompanied by a brief CV of the contributor, self declaration certificate, postal address, phone/cell numbers, E-mail ID(s).

Contributors are advised to check spelling, punctuation, sentence structure, and the mechanical elements of arrangements, spacing, length, and consistency of usage in form and descriptions before submission.

Final selection for publication will be made only at the recommendation of the Peer Review Panel. The details of the selection of paper will be communicated to the contributors. The editors reserve the right to make necessary editing for the sake of conceptual clarity and formatting.


Printed and Published by:
Mahatma Gandhi Education Society's
Centre For Humanities and Cultural Studies,
A-102 Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W).
Mob.: +91 9730721393 +91 8329000732

| | | |
|---|---|---|
| 35. बचतगट आणि महिला सबलीकरण | प्रा. शिंदे मीनाक्षी प्र. | 109 |
| 36. बचत गट आणि महिला सबलीकरण | प्रा. डॉ. मेंद बी. व्ही. | 114 |
| 37. Women Empowerment In India | Dr Arun R. Chavan | 116 |
| 38. शैक्षणिक धोरण व महिलाचे आर्थिक सबलीकरण | प्रा. कळसकर मनिषा प. | 121 |
| 39. पश्चिम विदर्भातील ग्रामीण महिला सक्षमीकरणात ... | डॉ. आशिष सुधाकरराव निमकर | 124 |
| 40. Women Empowerment: Issues and Challenges | D. B. More & Kamble Krushna S. | 128 |
| 41. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सबलीकरण | तृप्ती सु. गांगुर्डे & डॉ. घुसारे दीपक. व्ही. | 131 |
| 42. औद्योगिक क्षेत्रात महिलांचे योगदान | श्री. सावंत दत्तात्रय माणिक | 134 |
| 43. Media And Women Empowerment | Dure Yojana Uttam | 137 |
| 44. बचतगट आणि महिला सबलीकरण | मस्के महादेव तुळशिराम | 139 |
| 45. महिलांच्या आर्थिक समस्या व उपाययोजना | डॉ. रसाळ डी.सी. | 141 |
| 46. लघु व कुटीर उद्योगात महिलांचा सहभागडॉ. | आईलवार आशा पुं, | 144 |
| 47. कृषी क्षेत्रात महिलांचे योगदान | कु. भालेकर अर्चना महादेव | 147 |
| 48. Women's Human Rights | Fajge A.K. | 149 |
| 49. Rural Entrepreneurship | Doke Kiran Baburao | 151 |
| 50. बचत गट आणि महिला सबलीकरण | श्री. लांडगे के.डी. | 154 |
| 51. स्त्री सबलीकरण : लांबचा पल्ला | डॉ. कृतिका खंदारे | 157 |
| 52. महिला सबलीकरण : काल, आज आणि उद्या | डॉ. भारत हंडीबाग | 159 |
| 53. महिला सबलीकरण आणि मराठी काव्यातून चित्रीत होणारी स्त्री | डॉ. तुळशीराम चं.उकिरडे | 161 |
| 54. Women Empowerment And Indian Economy | Sawant B.S | 164 |
| 55. कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | प्रा. शिंदे ए. एस. | 166 |
| 56. Women And Criminal Law | Dr. A.P.Barve | 169 |
| 57. Women Empowerment In India: An Overview | Sonal A Ubale | 171 |
| 58. महिला सबलीकरणात स्त्रीवादी साहित्याचे योगदान | डॉ. दादाराव गुंडरे, | 174 |
| 59. आर्थिकदृष्ट्या महिलांचे सबलीकरण करण्यासाठी ... | श्री. बाळासाहेब वि. खोसे | 177 |
| 60. Women Empowerment Through Self Help Group | Dr. Sangale S. A & Birajdar S.G. | 179 |
| 61. Social Work, NGO, Women | Pratik Anil Kamble | 181 |
| 62. महिला सबलिकरण आणि आर्थिक विकास | प्रा. मोटे भैरवनाथ बब्रुवान | 183 |

Scanned with OKEN Scanner

58.

# महिला सबलीकरणात स्त्रीवादी साहित्याचे योगदान

**प्रा. डॉ. दादाराव गुंडरे,**
मराठी विभाग प्रमुख
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब
ता. कळंब जि. उस्मानाबाद

अनादि काळापासून स्त्रीला समाजव्यवस्थेने दुय्यम स्थान दिले. मनुप्रणित समाजव्यवस्थेने स्त्रियांना अत्यंत तुच्छ स्थान दिले. मनुस्मृतीतील नवव्या अध्यातील दुसऱ्या व तिसऱ्या श्लोकात मनुने लिहिले,

"पिता रक्षति कौमारे, भर्ता रक्षति यौवने
रक्षांती स्थावरे पुत्रा, न स्त्री स्वातंत्र्य महिति ||९.३||

यामधुन पुरुषांनी स्त्रीला कधीच स्वातंत्र्य देऊ नये, ती नेहमीच कुणाची तरी गुलाम असावी. बालपणी पिता, तरुणपणी पती व वृध्दपणी मुलाची गुलाम असावी असा जणु कायद्याच मनुस्मृतीने केला. धर्म व पुराण ग्रंथातील सनातनी विचाराला प्राधान्य देऊन स्त्रीला निम्न मानले. स्त्रीवर सातत्याने अन्याय, अत्याचार व छळ करण्यात आला. आपल्या देशापुरता विचार केला तरी सीता, द्रोपदीसारख्या स्त्रीयादेखील अन्यायाला बळी गेलेल्या दिसतात. मनुस्मृतीसारख्या ग्रंथाने स्त्रीयावरील बंधने अधिकच मजबुत केली. तिला धार्मिक कर्मकांड, वृतवैकल्य गुंतवून चुल व मुल, रांधा, वाढा व उष्टी काढा असे मर्यादीत कार्यक्षेत्र केले तर दुसरीकडे पुरुषांना महत्व दिले. एकूणच व्यवस्थेने, मनुस्मृतीने कोंडी झालेली स्त्री युगानयुगापासून अन्याय हा निमुटपणे सहन करत होती.

वास्तवित साहित्य आणि समाज यांचा अतुट संबंध असतो. साहित्य हे समाजरुपी सरोवरातून वर येते. त्या-त्या काळाचे प्रतिबिंब उमटविणारे साहित्य निर्माण होत गेल्याने विविध साहित्य प्रवाह उदयास आले. त्यामध्ये 'स्त्रीवादी साहित्य प्रवाह' हा एक महत्वपूर्ण प्रवाह आहे. महिला सबलीकरण ही स्त्री अधिकाराचा पुरस्कार करणारी, स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरी हक्क व अधिकार मिळावेत यासाठीची प्रक्रिया आहे. स्त्रीला अधिक आत्मनिर्भर, स्वावलंबी व विकसीत करण्यासाठी आजपर्यंत विविध घटकांच्या माध्यमातून प्रयत्न झाले. अगदी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून ते पुढे महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजाराम मोहन रॉय, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, महर्षी धोंडो केशव कर्वे, लोकहितवादी, गो.ग. आगरकर यांसारख्या अनेक समाजसुधारक व विचारवंतानी कृती व उक्तीचा समन्वय साधत स्त्रीयांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात झाला.

१८४८ पासून स्त्रीमुक्तीचा म्हणजे स्त्री विकासाचा विचार होऊ लागला. स्त्रीमुक्तीच्या विचारास एक धार प्राप्त झाल्याने स्त्री विकासाचा पाया खंबीर बनू लागला. त्यातच देशाला मिळालेले स्वातंत्र्य, राज्यघटनेची निर्मिती, राज्यघटनेने स्त्रीजीवनात निर्माण केलेली नवी पहाट, समाजसुधारकांचे प्रयत्न, शिक्षणाचा प्रचार व प्रसार यासारख्या महत्वपुर्ण बाबीमुळे स्त्रीजीवनाचा माणूस म्हणून चाललेला संघर्ष, लिंगभेदामूळे स्त्रीजीवनाची झालेली वाताहत या विरुध्द बंड करण्यासाठी अनेक चळवळी, प्रवाह उदयास आले. त्यामध्ये १९६० नंतर ठळकपणे पुढे आलेला स्त्रीवादी साहित्य प्रवाह हा एक महत्वपुर्ण प्रवाह आहे. या शोधनिबंधातून महिला सबलीकरणामध्ये स्त्रीवादी साहित्य प्रवाहाने जे योगदान दिले त्याचा धावता आढावा घेण्याचा प्रयत्न आहे.

स्त्रियांच्या उत्थानासाठी, स्त्रीमुक्तीचे बीज असणारी स्त्रीवाद ही संकल्पना असून या संकल्पनेचा अर्थ अनेकांनी सांगीतला. त्यामध्ये मंगला वरखेडे यांनी, 'पुरुषाला समाजरचनेत जसे एक अर्थपुर्ण स्थान आहे तसे स्त्रीलाही प्राप्त व्हावे यासाठी जीवनाच्या सर्व क्षेत्रात संघर्षशील राहणारी स्त्रीवाद ही एक विचारप्रणाली आहे.' तसेच रजिया पटेल यांनी, 'स्त्रीवाद म्हणजे माणूसपणाचा हक्क मिळवण्यासाठी प्रयत्न अपेक्षित आहे.' याशिवाय प्रिती सदावर्ते, विद्युत भागवत डॉ. निलम गोऱ्हे यासारख्या अनेकांनी स्त्रीवाद ही संकल्पना स्पष्ट केली आहे.

१९६० नंतर उदयास आलेल्या विविध चळवळीमध्ये स्त्रीवादी साहित्याचा स्वतंत्र प्रभाव आहे. ज्या साहित्याच्या केंद्रस्थानी 'स्त्री' हा विषय राहिला आहे. मराठी कवितेचा विचार केल्यास संत कवयित्रींच्या काव्यामध्ये स्त्रीवादी जाणीवा अभिव्यक्त होताना दिसतात. मध्ययुगीन काळातील संत साहित्यापासून स्त्रीजीवनाची विविध रुपे अविष्कृत झालेली दिसतात. परमेश्वर भक्तीने भारावलेल्या संत जनाबाई, संत मुक्ताबाई, कान्होपात्रा, सोयराबाई, संत बहिणाबाई यांनी अभंग, गौळणीच्या माध्यमातून स्त्रीजीवन प्रकट केले. 'डोईचा पदर आला खांद्यावरी | भरल्या बाजारी जाईन मी' असे म्हणणारी संत जनाबाई, धवळ्याच्या रुपाने रुक्मीणीचे मन उलगडून दाखविणारी महदंबा स्त्रीवादी साहित्याचा पहिली हुंकार आहे असे वाटते. ज्याचे काव्य ईश्वरभक्तीतून अवतरले त्या संत जनाबाई स्त्री जीवनाचे दुःख अभंगातून मांडताना म्हणतात, 'खंडेराया तुज करिते नवसु मरु देरे सासू खंडेराया' सासुरवासीन सुनेला सासु, सासरा, नणंद यांच्यामुळे देवाची भक्ती करता येत नाही हे दुःख अभंगातून मांडलेले दिसते.



Scanned with OKEN Scanner

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

आधुनिक काळातील स्त्रीवादी काव्याचा विचार केला असता प्रथमतः सावित्रीबाई फुले यांचे नाव घ्यावे लागते. त्यांनी आपल्या काव्यफुले' संग्रहातून पुरुषांच्या आळशीपणावर कोरडे ओढले.

"बाईल काम करीत राही
ऐतोबा हा खात राही
पशु पक्षांत ऐसे नाही
तयास मानव म्हणावे का? ||६||"

पुरुषांच्या ऐतखाऊ प्रवृत्तीवर कोरडे ओढून स्त्रीला जागृत करण्याचे काम त्या करतात. म्हणूनच त्या स्त्रीमुक्तीच्या आद्यप्रणेत्या ठरतात. सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा घेऊन पुढे अनेक कवयित्रींनी स्त्री जीवनानुभवास मोकळी वाट करुन दिली. स्वातंत्र्योत्तर काव्य वाङ्मयात प्रामुख्याने हिरा बनसोडे, अश्विनी धोंगडे, रजनी परुळेकर, पद्मा गोळे, अनुराधा पाटील, प्रज्ञा पवार, नीरजा, वृषाली किन्हाळकर, सुमती लांडे, उर्मिला चाकुरकर, ज्योती लांजेवार, कविता महाजन, जयश्री पाठक, अरुणा ढेरे, मल्लिका अमरशेख, प्रतिभा सराफ अशा कितीतरी कवयित्रींनी स्त्रीवादी कवितेचे दालन समृध्द केले. सामाजिक विषमतेवर, नाते संबंधावर आधारित असणाऱ्या या कविता महिला सबलीकरणासाठी पोषक ठरल्या.

आधुनिक काळात मराठीत स्त्रीवादी जाणीवेने लेखन केले ते ताराबाई शिंदे यांनी. त्यांनी ई.स. १८८२ मध्ये 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ लिहून पुरुष व त्याच्या पुरुषी प्रवृत्तीवर हल्ला चढविला. स्त्री व पुरुषाची तुलना निर्भिडपणे करत स्त्रीच्या अध:पतनास पुरुषच जबाबदार असल्याचे तसेच देवदेवतांची अनेक उदाहरणे देऊन पुरुष कसे कपटी, व्याभिचारी आहेत हे परखडपणे मांडले. ताराबाई शिंदे यांनी काळाच्या पुढचे व अतिशय परखड विचार व्यक्त केले. स्त्रीचे विविध स्तरावर होणारे शोषण, पुरुष संस्कृतीचे वर्चस्व राखण्याची रानटी वृत्ती यावर आपल्या खास शैलीत प्रहार केले. नवरा कसाही दुर्गुणी असला तरी देवाप्रमाणे मानुन कोण बरे वागेल? असा प्रश्न त्या आपल्या लेखनातून करतात. पुरुषाचे स्वातंत्र्य म्हणजे बाईची पराधिनता अशी परिस्थिती नसावी हे स्त्रीमुक्ती चळवळीचे उद्दिष्ट परखडपणे सांगितले आहे. त्यामुळे हा ग्रंथ स्त्रीहक्काची पहिली सनद मानला पाहिजे. त्यामुळे महिला सबलीकरणात या ग्रंथाचा विचार अग्रक्रमाने करावा लागतो.

पुरुषसत्ताक व्यवस्थेने स्त्रियांना दिलेले दुय्यम स्थान तसेच स्त्रीच्या स्वाभाविक वृत्तीवर लादलेली बंधने नाकारणारे ऱ्हदयस्पर्शी चित्रण कादंबरी वाङ्मयातूनही केले, यामध्ये 'शांता शेळके-विझली ज्योत, मालती दांडेकर-काटेरी मार्ग, कुमूदिनी प्रभावळकर-कुस्करलेले ऱ्हदय, गीता साने-फेरीवाला, जानकीबाई देसाई-अघोर, विभावरी शिरुरकर-हिंदोळ्यावर, गौरी देशपांडे-दुस्तर हा घाट' यासारख्या अनेक कादंबऱ्यांनी स्त्रीमुक्तीचे रणशिंग फुंकण्याचे केलेले काम महिला सबलीकरणास प्रेरणा देणारे, पोषक ठरणारे आहे.

स्त्रीवादी साहित्यात आत्मचरित्र्य हा साहित्यप्रकारही महिला सबलीकरणास पोषक ठरला. यामध्ये स्वातंत्र्यपुर्व काळात पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक, पार्वतीबाई आठवले तर स्वातंत्र्योत्तर काळात मल्लिका अमरशेख, 'मला उद्ध्वस्त व्हायचय' कुमूद पावडे, 'अंतस्फोट', बेबी कांबळे, 'जिणं आमुचं', नजुबाई गावित 'आदोर' यामधून समाजाच्या रुढीपरंपरेविरुध्द, अन्याय अत्याचाराच्या दलदलीतून वाटचाल करणाऱ्या स्त्रियांची आत्मकथने स्त्रीविषयक जाणीव प्रकर्षाने महिला सबलीकरणास प्रभावी बनवतात.

कथेच्या माध्यमातून काशिताई कानिटकर, आनंदीबाई शिर्के, कमलाबाई टिळक, ज्योत्सना देवधर, विजया राजाध्यक्ष, कुसूमावती देशपांडे, गौरी देशपांडे, कमल देसाई, छाया दातार, सानिया, प्रिया तेंडुलकर, आशा बगे यासारख्या स्त्री कथालेखिकांनी वास्तव जीवनाचे चित्रण करुन स्त्री दु:खासोबतच तिच्या भावभावना, लैंगिक जीवन धीटपणे मराठी साहित्यातून मांडले.

अगदी महात्मा फुलेंच्या शाळेत शिकणाऱ्या मुक्ता साळवे या मुलीने वयाच्या ११ व्या वर्षी लिहिलेल्या एका निबंधातून स्त्री जागृतीचा नमुना पुढे येतो. हा निबंध 'ज्ञानोदय' या पत्राने छापला होता. त्यात ती म्हणते, "ब्राम्हण लोक म्हणतात की, इतर जातींनी वेद वाचू नयेत. याचा अर्थ आम्हास धर्मपुस्तकही नाही. इंग्रजी राज्यापुर्वी, उच्च वर्गातील लोकांचा अपराध केला असता महार व मांगाचे डोके मारीत असत. गुलटेकडीच्या बाजारात फिरण्याची मोकळीक नव्हती. ती आता मिळाली" या देशातील स्त्रीमुक्तीचा हा पहिला उद्गार होता. स्त्रीवादी साहित्याच्या पहिल्या हुंकाराच्या पाठीशी आपल्या विचाराचे पाठबळ समर्थपणे उभे करण्याचे काम म. फुलेंनी केले.

याशिवाय नाटकाच्या क्षेत्रात ज्योत म्हापसेकरांचे 'मुलगी झाली हो' हे नाटक जीवनावर प्रकाश टाकते. साठोत्तरी काळात जागतिक स्तरावर अनेक देशात स्त्रीमुक्ती आंदोलनाची चळवळ सुरु झाली. याचा प्रभाव अनेक देशावर पडला. याच्याच प्रभावातून महाराष्ट्रातही वैचारिक पातळीवर मुख्यत: स्त्रीदास्याचा शोध घेण्याचे काम छाया दातार, विद्या बाळ, शांता किर्लोस्कर यांनी केले. छाया दातार म्हणतात, 'स्त्रिया स्त्रियांमध्ये भिंती निर्माण करण्याचे काम पुरुषसत्ताक कुटूंब व्यवस्थेने निर्माण केले. त्यामुळे स्त्रीमुक्तीचा विचार करताना केवळ आर्थिक विचार करुन चालत नाही तर कुटूंब व्यवस्थेला पर्याय शोधण्याचा, स्त्री-पुरुष संबंध वैयक्तिक पातळीवर खाजगी क्षेत्रात असे अद्यावत याची पुर्नरचना कशी व्हावी याचा विचार करावा लागतो.' तसेच विद्या बाळ यांनीही स्त्रीमुक्तीचे विचार मांडताना म्हटले, "लिंगभेदावर आधारित स्त्री-पुरुषांची प्रतिमा घडविण्याऱ्या संस्कार व्यवस्थेला आव्हान दिल्याशिवाय स्त्रीचे माणूस म्हणून जगणे शक्य होणार नाही." ही वस्तुस्थिती त्यांनी लक्षात आणून दिली. आंतरराष्ट्रीय स्तरावर माहिला वर्ष म्हणून १९७५ हे वर्ष घोषित केले गेले. त्यामुळे जागतिक स्तरावर व भारतातही स्त्री



Scanned with OKEN Scanner

प्रश्नाकडे समाजाची दृष्टी वळली. मोठ्या प्रमाणात अनेक घटकांनी स्त्री मुक्ती आंदोलनास अर्थात त्यामध्ये असणाऱ्या साहित्याने महिला सबलीकरणास गती देण्याचे काम केले. ही बाब मान्य करावी लागते.

याशिवाय स्त्रीवादी साहित्यामध्ये लेखक-कवींनीही हातभार लावल्याचे दिसून येते. या शोधनिबंधात प्रामुख्याने स्त्रीयांनी केलेल्या लेखनावरच प्रकाश टाकण्याचा हेतू आहे. एकूणच अनेक पातळ्याप्रमाणे साहित्याद्वारे स्त्रीवादी दृष्टीकोनातून लेखन करुन साहित्याचे क्षेत्र काबीज केल्याचे दिसून येते. ज्यामुळे महिला सबलीकरणात स्त्रीवादी साहित्याचे मोलाचे योगदान असल्याचे स्पष्ट होते.

**निष्कर्ष :-**

साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध आहे. भारती परंपरेचा विचार केल्यास येथे पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व दिसते. मनुस्मृतीने, धर्म व पुराण ग्रंथातील सनातनी विचाराला प्राधान्य देणाऱ्या स्त्रीला निम्न केले. रुढी-परंपरेने स्त्रीला उपजतच मारुन टाकले. प्राचीन युगापासून भारतीय भूमीत स्त्री-पुरुष समानतेचा विचार मांडणाऱ्या कितीतरी परंपरा पुढे आलेल्या दिसतात. त्यांच्या व्यासपीठावरुन स्त्रियांच्या विकासाच्या, तिच्या मुलभूत प्रश्नांचा वेध घेतलेला दिसतो. हजारो वर्षापासून स्त्री-पुरुष समानतेचा, महिला सबलीकरणाचा विचार साहित्याने मांडले. स्त्रियांच्या समस्येस स्त्री-पुरुष विषमतेचा लिंगभाव दृष्टीकोन आणि पुरुषसत्ताक वृत्तीची मक्तेदारी कारणीभूत आहे. १९ व्या शतकात महात्मा फुले यांच्या वैचारिक नेतृत्वाने स्त्री विकासाची मजबुत मुहूर्तमेढ रोवली गेली. स्त्रीसुधारणेचा विचार अनेक विचारवंताप्रमाणे स्त्रीवादी साहित्यिकांनी केंद्रस्थानी मानला. महिला सबलीकरण ही स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क व अधिकार मिळवून देणारी विचारप्रणाली असून स्त्रीवाद हा मानवतावादी समताधिष्ठीत जीवनमुल्यांचा पुरस्कार करणारा प्रवाह आहे. स्त्रीवादी साहित्याची परंपरा असलेल्या मध्ययु संत काव्यापासून ते आधुनिक काळातील साहित्याचा विचार केला असता स्त्रीला पुरुषाबरोबर स्थान व वाटा मिळावा आणि तीही सक्षम व्हावी हा विचार अभिव्यक्त होतो. स्त्रीवादी साहित्याने काव्य, कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र या प्रकारातून स्त्रियांवरील अन्याय-अत्याचाराची विषमतेची चौकट याला तडे देण्याचे, हादरे देण्याचे काम केले. १९६० नंतर ठळकपणे पुढे आलेल्या स्त्रीवादी साहित्याने स्त्री प्रश्नांना वाचा फोडण्याचे, पुरुषप्रधान व्यवस्थेला आव्हान देण्याचे काम केले. स्त्री दृष्टीकोनातून स्त्रीजीवनाचे चित्र साकारले. यामुळे महिलांचे प्रश्न शब्दबध्द करण्यासह, स्त्रीजागृती होण्यास मोठा हातभार लागला. महिला सबलीकरणात स्त्रीवादी साहित्याची भूमिका खूप महत्त्वाची आहे हे वरील विवेचनावरुन लक्षात येते. कारण हे साहित्य महिला सबलिकरणास अनुकूल ठरणारे व दिशादर्शक आहे हे मात्र नक्की.

**संदर्भ :-**

१. डॉ. मधुबाला खोपडे-'स्त्रियांचे गद्यलेखन'
२. ल.रा. नशिराबादकर-'मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास'
३. संपादक मराठी अभ्यास मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, 'साहित्यसुगंध', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती-जून,२०१०
४. मंगला वरखेडे, 'स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना व उपयोजन', संपादक-का.स.वाणी, प्रगत अध्ययन संस्था, धुळे प्रथम आवृत्ती, १९९९
५. संपादक सुमती लांडे, 'स्त्रीवाद', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपुर, प्रथमावृत्ती-२००७
६. संपादक स. मालशे, 'स्त्री-पुरुष तुलना', मुंबई-१९७५

❑❑❑



Scanned with OKEN Scanner